2016-17

॥ विद्या विनयेन् शोभते ॥

# JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA
# POI'S ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, GOVELI

NAAC-Accredited

**Affiliated to University of Mumbai**

## ONE DAY NATIONAL CONFERENCE

on

## "Emerging Approaches in Humanities, Social Sciences & Commerce"

**On Saturday 4th Feb. 2017**

**organized by**

**Department of Humanities, Social Sciences & Commerce**

ISBN- 978-1-365-72753-5



INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF INDIA

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 23. | केदारनाथ अग्रवाल के उपन्यास 'पतिया' में स्त्री विमर्श<br>*संतोष नागरे* | 67 |
| 24. | नासिरा शर्मा का कथा साहित्य : पारिवारिक समस्याओं के संदर्भ में<br>*विजयकुमार राऊत* | 70 |
| 25. | दलित अस्मिता – एक भंगी कुलपति की अनकही कहानी<br>*डॉ. अनिल सिंह* | 73 |
| 26. | सूर्यबाला की कहानियों में नारी चेतना<br>*ज्योती बी. थोरात* | 76 |
| 27. | मिथिलेश्वर की कहानियों में ग्राम जन–जीवन<br>*डॉ. बाळासाहेब पगारे* | 79 |
| 28. | मृदुला सिन्हा की कहानियों में नारी पक्ष<br>*साधना एस. पी. द्विवेदी* | 81 |
| 29. | अल्मा कबूतरी उपन्यास में चित्रित आदिवासी नारी जीवन<br>*सतीश मधुकर साळवे* | 83 |
| 30. | मानव संसाधन विकासातील उच्च शिक्षणाची भुमिका<br>*गरुड एस.जी.* | 87 |
| 31. | सामाजिक न्यायाची संकल्पना<br>*प्रा.डॉ.सिध्देश्वर एन.सटाले* | 91 |
| 32. | **"POVERTY AND SOCIAL JUSTICE: IN INDIA"**<br>*Prof. Kochewad Satish Dnyanoba* | 94 |
| 33. | मानव संसाधन विकासातील व्यावसायीक व तंत्र शिक्षणाचीभुमिका<br>*शिंदे ज्ञानेश्वर साहेबराव* | 97 |
| 34. | सामाजिक शास्त्रात वैज्ञानिक पध्दतीचा वापर: स्वरूप व मर्यादा<br>*किर्तीकर वाल्मीक भीमराव* | 100 |
| 35. | जलव्यवस्थापन आव्हाने व उपाय<br>*जयनाथ माणिकराव पठाड* | 102 |


Scanned with CamScanner

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF INDIA

VOLUME-II,ISSUE-VI, FEB-2017

# सामाजिक न्यायाची संकल्पना

प्रा.डॉ.सिध्देश्वर एन.सटाले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई जि.बीड.

परंपरेने सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारित समाजांमध्ये आज 'सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे खूप आकर्षण आहे. शतकानुशतके वरचढ राहिलेल्या घटकांनी सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यांचा मोठा वाटा बळकावला आणि बहुसंख्य समाजाला या तिन्ही गोष्टींना वंचित ठेवले. लोकशाही मूल्यांची समाजात रुजवणूक झाल्यानंतर ही परंपरागत विषमता असाहय झाली आणि यातूनच सामाजिक न्यायाची कल्पना प्रचलित झाली. ''समाजात ज्या वस्तूंची व सेवांची निर्मिती होते त्यांचे वितरण संपूर्ण समाजभर रास्त व योग्य प्रकारे झाले पाहिजे. सर्वांच्या अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा भागल्याच पाहिजेत. या गरजा भागविण्याचा प्रत्येकाला हक्क असला पाहिजे. त्याखेरीज व रास्ततेच्या तत्वावर वाटप झाले पाहिजे. ही सामाजिक न्याय व संकल्पनेची मुख्य सूत्रे आहेत.जेव्हा आपण तात्विक न्यायाच्या प्रश्नासंबंधी चर्चा करतो तेव्हा अशा काही निकषासंबंधी विचार करावा लागतो, ज्यानुसार भिन्न–भिन्न व्यक्तींमध्ये वस्तु सेवा, संधी, लाभ इत्यादींच्या वाटपाला न्याय ठरवू शकू. डेव्हिड मिलरने आपल्या सुप्रसिध्द ग्रंथात 'सोशल जस्टिस' (सामाजिक न्याय) (१९७६) तीन अशा मापदंडाचे विश्लेषण केले आहे. ज्याच्या आधारावर वित्तीय विचारवंत न्यायाच्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर शोधतात. १. 'स्वीकृत अधिकाराचे 'संरक्षण' ही आहे. हा श्रेणीतंत्रीय व्यवस्थेला जन्म देतो. याचा प्रमुख प्रवर्तक डेव्हिड हयुम (१७११–७६) आहे. २. 'योग्यतेनुसार वितरण' हा आहे. हा प्रतिस्पर्धात्मक बाजार व्यवस्थेला पोषक आहे. याचा प्रमुख पुरस्कर्ता हर्बर्ट स्पेन्सर (१८२० ते १९०३) आहे. ३. तिसरा नियम– समुदायाला' चालना देतो. याचा प्रमुख पुरस्कर्ता पीटर क्रॉपॉटकिन (१८४२–१९२१) आहे. या विश्लेषणाला एका तक्त्याच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे मांडता येईल.

सामाजिक न्यायाची विविध प्रारुपे

| न्यायाचा मापदंड निकष | यांच्याशी जोडलेली समाजव्यवस्था | प्रमुख प्रवर्तक |
|---|---|---|
| स्वीकृत अधिकारांचे संरक्षण | श्रेणीबध्द व्यवस्था | डेव्हिड हयूम (१७११–७६) |
| योग्यतेनुरुप वितरण | प्रतिस्पर्धात्मक बाजार | हर्बट स्पेन्सर (१८२०–१९०३) |
| गरजेनुसार वितरण | एकसंध समुदाय | पीटर क्रॉपॉस्किन (१८४२–१९२१) |

या तिन्ही विचारधारांचे विश्लेषण केल्यावर हे कळून येईल की, यामधील एखादी एकटी संकल्पना संपूर्ण न्यायाला अभिव्यक्त करु शकत नाही. जर स्वीकृत अधिकारांचे संरक्षण हाच न्याय असेल तर मग समाजातील वर्तमान सामाजिक, आर्थिक विषमताना दूर करण्याचा काही मार्ग वा उपाय उरणार नाही. जर 'योग्यतेनुरुप वितरणा' लाच जर न्याय मानले तरीही वर्तनात व्यवस्थेत काही आमूलाग्र परिवर्तनाची शक्यता दिसत नाही. कारण योग्यता अर्जित व विकसित करण्याची संधी काही मोजक्या लोकांच्या अधिकारकक्षेत राहील आणि सर्वसामान्यांना हा बहाना करुन सुख–संपत्तीपासून वंचित ठेवले जाईल आणि जर 'गरजेनुसार वितरणा' ला न्यायाचा नियम मानले तर अनेक समस्या गरजांचा विचार केला जाईल का? मानसिक गरजांकडे दुर्लक्ष केले जाईल किंवा नाही?



Scanned with CamScanner

थोडक्यात यातून व्यापक व परिपूर्ण न्यायाचा अर्थ पूर्ण होत नाही. ही व्यापक संकल्पना नाही.विस्तृत अर्थाने, 'सामाजिक न्याय' शब्दावलीतून 'सामाजिक, आर्थिक, राजकीय' तिन्ही प्रकारच्या न्यायाचा बोध होतो. मर्यादित अर्थाने, 'सामाजिक न्याया'चा अर्थ हा आहे की, सामाजिक जीवनामध्ये सर्व मनुष्याची प्रतिष्ठा मान्य होईल, स्त्री—पुरुष, काळे—गोरे वा जाती, धर्म, प्रदेश इत्यादींच्या आधारावर मोठा—लहान वा उच्च, नीच न मानने, शिक्षण व विकासाची संधी सर्वांना मिळू शकेल अशा पध्दतीने सामाजिक न्यायाचा विचार निर्बल व निर्धन पक्षकारांना विशेष साहाय्यता आणि संरक्षण देण्याची मागणी करतो, परंतु वरील गोष्टींची पूर्तता जेव्हा होणार नाही तेव्हाच सामाजिक न्यायाची मागणी पुढे येते.ज्या समाजव्यवस्थेने हजारो वर्ष बहुसंख्य समाजघटकांना सामाजिक न्याया नाकारला आणि आजही जाती—धर्माच्या पारंपरिक व ताठर चौकटींना कवटाळून जी उभी आहे, ती समाजव्यवस्था आणि तिला आधारभूत असलेली मूल्यव्यवस्था उखडून त्या जागी नवसमाजनिर्मिती केल्याखेरीज सामाजिक न्याय शक्य नाही. अशी खात्री सामाजिक न्यायाच्या पुरस्कर्त्यांना वाटते. यातूनच या न्यायाची मागणी जोर धरते.

समाजिक न्यायाच्या बाजू :

'सामाजिक न्याय' या संज्ञेत जरी फक्त 'सामाजिक' एवढाच निर्देश असला तरी त्या संकल्पनेला सामाजिक, राजकीय, आर्थिक असे तिन्ही संदर्भ असतात.

१. सामाजिक बाजू :स्तरीकरणातून समाजामध्ये जी उतरंड असंख्य वर्षापासून निर्माण झालेली असते ती वरचढ स्तरांना विशेषाधिकार आणि जसजसे खालच्या स्तराकडे यावे तसतशी अधिकार—वंचितता यावर आधारित असते. स्तरानुसार सत्ता व प्रतिष्ठाही कमी—अधिक असते. व्यवसायही उच—नीच ठरवले जातात. निम्न स्तर निर्वाहासाठी उच्च—स्तरावर कायम अवलंबून असल्यामुळे त्यांच्या व त्यांच्या कामांचा दर्जा निम्न (दुय्यम) ठरवला जातो. यातूनच सामाजिक विषमता वाढते. स्पृश्य—अस्पृश्य असा भेद समाजात पडतो. निम्न वर्गाला नागरिक अधिकारापासुन वंचित राहावे लागते. विकासाच्या संधी काढून घेतल्या जातात.

समाजिक न्यायाची 'सामाजिक' बाजू या अवैध—अनैतिक व अमानुष भेदभावांचा निषेध करुन वंश, धर्म, जाती, वर्ण, प्रदेश, लिंग, पंथ याचा निषेध करुन भेदभावाचे निकष बाद ठरविते. तसेच विकासापासुन जे वंचित आहेत त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष संधीची मागणी करते.

२. राजकीय बाजू :सर्वांना राजकीय अधिकार किंवा प्रशासनात सेवाप्रवेश देताना धर्म, वंश, जात, लिंग वगैरे अप्रस्तुत निकषाच्या आधारे भेदभाव केला जाणार नाही ही सामाजिक न्यायाची 'राजकीय' बाजू म्हणता येईल, पण यापेक्षाही महत्वाची गोष्ट अशी की, व्यक्तींच्या राजकीय अधिकारांचे मूळ प्रयोजन संपूर्ण मानवी समुदायाचे हित हे असल्यामुळे राजकीय हक्क उपभोगताना समुदायाच्या हितसंबंधांना बाधा पोहोचणार नाही हे बंधने सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक ठरते, परंतु समूहाला हानिकारक असणाऱ्या काही गोष्टी नाकारल्या जावू शकतात. उदा.धर्मपिसाट संघटना, सभ्यता नष्ट करु पाहणारे घटक इत्यादी.

३. आर्थिक बाजू :प्रत्येक व्यक्तीला पर्याप्त रोजगार निरोगी जीवनमानासाठी आवश्यक असलेले अन्न, पुरेशा सुखसोयी या गोष्टी मिळायला पाहिजेत. कारण या गोष्टींना वंचित झालेल्या व्यक्तींच्या इतर स्वातंत्र्यांना कवडीचीही किंमत राहणार नाही. उत्पादनाच्या प्रक्रियेत कोणी व्यक्ती दुसऱ्यांचे जीवन नियंत्रित करणार नाही. तसेच उत्पादित वस्तूचे वितरण न्यायिक तत्वावर होवून सर्वांना त्या उपभोक्ता आल्या पाहिजे. तरच सामाजिक न्यायांतर्गत आर्थिक न्याय निर्माण होवू शकतो. ही सर्व जबाबदारी राज्यसंस्थेची आहे. प्रस्तुत अर्थाने 'राजकीय न्याय' 'स्वातंत्र्य' च्या आदर्शाला प्राथमिकता देतो, 'आर्थिक न्याय' 'समानता' च्या आदर्शाला महत्व देतो आणि सामाजिक न्याय 'बंधुत्व' या आदर्शाला मूर्त रुप देवू इच्छितो या तिन्हींना एकत्र आणण्यातूनच सामाजिक जीवनात न्यायाच्या व्यापाक आदर्शाची सिध्दी केली जावू शकते.

सामाजिक न्याय सामाजिक न्यायाची संकल्पना ही लोकशाहीशी निगडीत असते. लोकशाही ही जीवन जगण्याची पध्दती मानली जाते. लोकशाही व्यवस्थेमध्ये कल्याणकारी राज्याची कल्पना निहित असते. समाजातील सर्व घटकांचे सर्वांगीण कल्याण झाले पाहिजे. या दृष्टीने सामाजिक न्यायाची संकल्पना अस्तित्वात आली. सामाजिक न्यायाच अर्थ असा होतो की, राज्यातील नागरिक—नागरिकांमध्ये सामाजिक परिस्थितीच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणे आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या परिपूर्ण



Scanned with CamScanner

विकासाची पूर्ण संधी प्राप्त करुन देणे होय. व्यक्तीच्या चांगल्या व परिपूर्ण जीवनासाठी आवश्यक असणारी परिस्थिती आणि संधीची समानता प्रत्येक व्यक्तीला प्राप्त करुन देणे हा सामाजिक न्यायाचा उद्देश असतो आणि तो लोकशाही कल्याणकारी राज्यांमध्येच पूर्णत्वाला जावू शकतो. न्यायाचा विचार हा संपूर्ण समाजव्यवस्थेच्या दुपटीने करावा लागतो. सामाजिक जीवनाचे तीन मुख्य पैलू असतात. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक पैलू मिळून समाज जीवनाची परिपूर्ती होत असते. हे तिन्ही पैलू एक दुसऱ्यांशी पूरक असल्यामुळे त्यां एकत्र विचार करणे म्हणजे सामाजिक न्यायाचा विचार करणे होय.सामाजिक न्यायाच्या संकल्पनेमध्ये सामाजिक जीवनामध्ये सर्व व्यक्ती समान व प्रतिष्ठित मानने महत्वाचे असते. वर्ण, वंश, जाती, धर्म, संपत्ती आणि स्त्री–पुरुष या कोणत्याही आधारावर सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा प्राप्त न होता त्या त्यांच्या गुणवत्तेच्या आधारावर प्राप्त झाल्या पाहिजेत. कोणत्याही व्यक्तीला प्राथमिक गरजेच्या परिपूर्ततेपासुन वंचित ठेवले जावू नये आणि कोणत्याही व्यक्तीला विशेष सवलती देवून समाजात विषमता निर्माण होवू नये याची दक्षता सामाजिक समतेमध्ये घेणे आवश्यक असते. सामाजिक कोणत्याही व्यक्तीला श्रेष्ठ कनिष्ठ मानणे किंवा तिच्या विकासापासून वंचित ठेवणे योग्य होणार नाही. भारताचे माजी सरन्यायाधिश यांनी सामाजिक न्याय म्हणजे अनेकांना संधी नाकारणारी आर्थिक व सामाजिक परिस्थिती संपुष्टात आणणे होय असे म्हटले होते. याचाच अर्थ सामाजिक व आर्थिक समतेसाठी प्रयत्न करणे हा सामाजिक न्यायाचा गाभा असतो. सामाजिक न्याय हा कायद्याचा अधिराज्यावर उभा असतो. सामाजिक न्यायाची प्रस्थापना संविधानात्मक मार्गानेच झाली पाहिजे. तसेच समाजातील एखाद्या गटावरील अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न होत असताना इतरांवर अन्याय होणार नाही यांची काळजी घेणे आवश्यक असते. सर्व घटकांच्या विकासासाठी समान संधी उपलब्ध करुन देण्यात सामाजिक न्याय असतो. जिथे अन्यायाचे परिमार्जन झालेले असते तिथेच न्याय प्रस्थापित झालेला असतो. समाजातील वंचितांना आणि स्त्रियांना जी संधी, प्रतिष्ठा आणि विकासाचे मार्ग समाजाने नाकारले ते कायद्याच्या आधारावर पुर्नप्रस्थापित करणे सामाजिक न्यायाला अभिप्रेत असते.सामाजिक न्यायाच्या प्राप्तीसाठी राजकीय न्यायाची आवश्यकता असते. राजकीय कायद्याचे अधिराज्य ही संकल्पना असते. आर्थिक दृष्टीने व्यक्ती स्वावलंबी असल्याशिवाय राजकीय अधिकारांना अर्थ प्राप्त होत नाही. त्यामुळे आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. सर्वांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता, आर्थिक आधारावर होणारी पिळवणूक थांबविणे, समान कामाचा समान मोबदला, आर्थिक विषमता कमी करणे संपत्तीच्या आधारावर व्यक्ती व्यक्तीमध्ये भेदभाव न करणे, आर्थिक परिस्थितीच्या आधारावर करांची आकारणी करणे या पध्दतीने समता साध्य करण्याचा प्रयत्न होवू शकतो.

सारांश :

व्यापक अर्थाने, सामाजिक न्यायाचा हा मूलमंत्र आहे की, संघटित समाजिक जीवनातून जे काही लाभ प्राप्त होतात, ते काही मोजक्या लोकांच्या हातामध्ये केंद्रित न होता सर्वसामान्य व्यक्तींना—विशेषता: निर्बल—निर्धन वर्गांना त्यात रास्त वाटा मिळावा जेणे करुन ते सामान्यत: सुखी सन्मानपूर्ण आणि निश्चित जीवन जगू शकतील. सामाजिक न्यायाची मागणी आहे की, उत्पन्न आणि संपत्ती यांचा संबंध विशेषाधिकार परंपरा वा वंशपरंपरा यांच्याशी नाही तर श्रम आणि कर्तव्यपालनाशी असला पाहिजे. थोडक्यात सामाजिक न्यायांतर्गत सर्वसामान्य व्यक्तीच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. अशी वितरण व्यवस्था राज्याने उभी करावी अशा पध्दतीने समाजातील व्यक्ती घटकांचा सामाजिक, राजकीय आर्थिक आधारावर एकत्र विचार करुन दुर्लक्षित घटकांना अधिक सवलती देवून त्यांना प्रतिष्ठित व आत्मसन्मानीत जीवन जगता येईल अशी व्यवस्था निर्माण करण्यात सामाजिक न्याय दडला आहे. निसर्गाने माणसांना कमी अधिक पात्रता देवून विषमता निर्माण केली आहे. ही विषमता दूर करुन दुर्बल व मागास वर्गांना विकासाची संधी उपलब्ध करुन देणे सामाजिक न्यायात अपेक्षित असते. मानवाला सद्सद् विवेक बुध्दी असल्यामुळे तो निसर्गाच्या अन्यायाचे सामाजिक न्यायात परिवर्तन करु शकतो.

संदर्भ :

१. राजकीय सिध्दांत— प्रा.सुधाकर कुलकर्णी
२. राज्यशास्त्रातील मुलभूत संकल्पना— प्रा.किसन चोपडे
३. उच्चतर आधुनिक राजकीय सिध्दांत— डॉ.एस.बी. फड



Scanned with CamScanner